भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट

# विश्वशांति वृत्तांत

Vishwashanti Vrittant

अंक : ३९ मार्च २०२४

## स्मृतिगंध

### श्री सद्‌गुरु सरदेशमुख महाराज यांचे चरणी सेवक : भाग-१

मी १९५२ साली महाराजांकडे प्रथम गेलो. मोहन माझा चुलत भाऊ. मला घेऊन गेला. कारण मी थोड्या मानसिक त्रासात होतो. माझा त्यावेळी धंदा बेकरीला माल देणे. घरच्यांपासून मी एकटाच राहात होतो. मी गेलो, बसलो, पाया पडलो. त्यांनी माझी ओळख करुन घेतली व म्हणाले की, येत जा. मग आपण बोलू. त्याप्रमाणे मी त्यांचेकडे जावून बसे, त्यांच्याकडे येणारे लोकांना ते न विचारता त्यांना मार्गदर्शन करीत. ते ऐकून मला कळले की, हि काही सामान्य व्यक्ती नाही, एक श्रेष्ठ व्यक्ती असून लोकांना न विचारता त्यांचे प्रश्नाचे समाधान करणारी आहे. ते सांगत की आपल्या वाडवडिलांच्या भक्ती ठिकाणी जाऊन दर्शन करुन या. म्हणजे तूमची वाडवडिलांची केलेली पुण्याई उपयोगी पडेल. त्या प्रमाणे लोक जात व त्यांचे अनुभव सांगू लागत. त्यावेळी मलाही ते ऐकून आनंद वाटे. मी माझ्या बद्दल विचारले, त्यांनी सांगितले की, तुमचे गावी अगर कोठे ठिकाण दिसते. महादेव हरवला व परत सापडला आहे. त्यावेळी मला ते कळले नाही. पुढे बरेच वर्षांनी मला ते म्हणणे अनुभवाने पटले. माझे वडिल नदीच्या ठिकाणी जात असून पूजा करत. पुढे पुरात ते ठिकाण बुजून गेले. मग आम्ही त्या ठिकाणाचा शोध घेऊन गाळ बाजूला केला व पिंडीचा भाग दिसू लागला. पुजा करण्यासाठी वडील गावाजवळ नदीत महादेवाची पींड व नंदी असलेले ठिकाण तेथे पूर आला की पूर्ण गाळाने बूजून जात. मग म्हणजे हरवला वडील त्यांचे अंदाजे ठिकाणाचा शोध घेऊन आम्ही तो गाठ काढून बाजूला केला की, पिंडीचा भाग दिसून लागे मग अंदाजे पींड व साकुवा दिवली की खणणे बंद करुन पुजा करीत. या ठिकाणी २००० साली मध्ये मंदिर बांधले गेले आहे. ही घटना गाव न पाहाता सांगणे म्हणजे नवल होते. मी जावून त्यांचे जवळ बसू लागलो. 'श्री' हे कसबा पेठेत रहात होते. छोटी भाड्याची जागा तेथे बरेचजण बसत. मग काही धार्मिक विषय निघाला की त्यांच्या कडून बरीच कधी न ऐकलेली धार्मिक माहिती मिळत. भक्ती मार्गाकडे ओढ होऊ लागली. मी त्यांना प्रश्न विचारले की, मी काय करावे ? त्यांनी सांगितले की, प्रथम तू आहे ते पैसे संपवून टाक. प्रथम तू पूर्ण रिकामा हो. जसे लिहिलेली पाटी पुसून कोरी होते. मग नवीन लिहिता येईल, इतकी कोरी कर. त्याप्रमाणे मी सर्व संपवून टाकले. मग रोजच्या खाण्याची सुध्दा अडचण आली तरी न डगमगता त्यांच्या श्रध्देवर विश्वास ठेवून अडचणीला तोंड दिले. कधी त्यांचे येथेच खात असे. त्यानंतर अडचणी चालू होत्या. शेवटी परिस्थिती एका कपड्यावर आली. श्रध्दापूर्ण असल्यामुळे तो मार्ग सोडला नाही. त्यानी मला सांगितले की, तुला व्यापार माहीत आहे. धंदा टाक. पैसे नाही मग कसे होणार ? पण त्याच वेळी माझी बहीण व मेहुणे यांनी पैसे देऊन मला मदत केली. धंदा काय करावा ? म्हणून विचारले तर दुकान भाड्याने घे, मग ठरवू धंदा! एक दुकान भाड्याने मिळाले त्यावेळी पागडी वगैरे नव्हती. १९५४ मध्ये दुकान भाड्याने घेतले. जुनी पध्दती प्रमाणे सजविले, गादी तक्या घेऊन त्या जागेत टाकले. रोज त्याचे चादर खोळ बदलणे व गादी ही गुरुचीच समजून रहाणे. दुकानावर सकाळी तेही १० पर्यंत बसून नंतर ते ऑफीसला जात. त्यांना सोडून आलो की दुकानात बसणे, ५ वाजता त्यांना घेऊन येऊन दुकानात बसून आध्यात्मिक गोष्टी त्यांचे कडून ऐकणे व येणाऱ्या लोकांचे प्रश्न कसे सांगतात हे ऐकणे असे ११ महिने दुकान मोकळे. लोक हसत पण तिकडे लक्ष दिले नाही. त्या ११ महिन्यात संगत, मित्र, उगीच फिरणे यांचा सवय पूर्ण पणे बंद करण्यासाठी ११ महिने गेले असे वाटते, एक ठिकाणी थांबणे. सर्व मित्र बंद झाले. मन एकदम रिकामे झाले. आपण धंदा काय करावा ? म्हणून ठरले. त्यासाठी पोते वजन करणारा साखरेचा काटा मापे घेण्यास सांगितले तसे काहीही न विचारता केले. पुढे साखरचे होलसेल भावात रिटेल विक्रीचा बोर्ड लावला. ५ शेर ठोक भावात मोठ्या काट्यावर, आहे त्या भावातच साखर विक्री सुरु केली.

भांडवल १ पोते साखरेचे म्हणजे १०० रु. ५ शेर म्हणजे २० ग्राहकांचा माल. नफा काय? तर रिकामा बारदान. त्याची किंमत दीड रुपया होई. संपला माल की तेच पैसे घेऊन नवीन पोते आणणे, परत परत तसे दिवसात खरेदी ४-५ वेळा सायकलवर जावून करीत असे. या प्रमाणे व्यवहारात मला आनंद वाटू लागला. मग एक दिवस महाराजांकडे शेजारचे दुकारदार आले व म्हणाले, हा मुलगा दुकान बंद करुन परत माल आणतो हे का? त्यावर महाराज म्हणाले, भांडवल नाही. त्यावर ते गृहस्थ म्हणाले, मी एक हजार रुपये देतो, मला बँके एवढे व्याज देईल का? तुम्ही जामीन असला तर देतो. मग १० पोती साखर दुकानात आली. धंदा वाढला.

पुढे साखर परमीट झाले. साखर परदेशातून गोदीवर येईन व मग रेल्वेने बॅगनीच खरेदी करावी लागणार. त्या गृहस्थामुळे आम्ही ठोक व्यापारी बनलो. हे स्वप्ना सारखे घडले ना. हा माझा अनुभव मी सांगितला आहे.

उर्वरित भाग पुढील अंकात........

**श्री. लालचंद नहार**

## National Seminar - Jaipur



दिनांक १२ मार्च व १३ मार्च २०२४ रोजी National Institute of Ayurved, Jaipur येथे Cancer of GIT with focus to develop & established clinical protocol on diagnosis and management of Cancer of GIT या विषयावर राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यासाठी देशभरातून अनेक ठिकानांहून कॅन्सर चिकित्सेतील आयुर्वेद तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आले. भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरच्या डेप्युटी डायरेक्टर डॉ. विनीता देशमुख यांना या Seminarसाठी तज्ज्ञ चिकित्सक म्हणून आमंत्रित करण्यात आले. डॉ. नीलांबरी सरदेशमुख यांचीही या Seminarसाठी उपस्थिती लाभली.

## स्वास्थ्यसंजीवनी

### द्राक्षा (मनुका)



द्राक्षा हा शब्द संस्कृत मध्ये (आयुर्वेदामध्ये) 'द्राक्ष' या फळासाठी तसेच त्याच्यापासून तयार केलेल्या मनुकांसाठी वापरला जातो. आयुर्वेदानुसार काळ्यारंगाची गायीच्या सडासारखी लांबट असणारी (गोस्तनी), बिया असणारी द्राक्षे ही उत्तम समजली जातात. समाजमानसात ज्या प्रमाणे आंबा हा फळांचा राजा समजला जातो, त्याप्रमाणे आयुर्वेदामध्ये द्राक्षा ही 'फलोत्तमा' सांगितली आहे.

द्राक्षाचे लॅटिन नाव Vitis vinifera Linn असून ती Vitaceae फॅमिलीतील वेल जातीय वनस्पतीची फळे आहेत. बाजारात हिरव्या रंगाची, लालसर रंगाची तसेच काळ्या आणि आकाराने गोल आणि लांबट अशा विविध प्रकारची द्राक्षे विकत मिळतात. कमीतकमी रासायनिक फवारणी केलेली, बिया असणारी काळी लांबट द्राक्षे खाण्यासाठी सर्वात चांगली.

द्राक्षा तसेच मनुका रस विपाकाला मधुर आणि वीर्याने शीत आहे. सालीला थोडीशी तुरट आहे व पचायला थोडी गुरु आहे वात आणि पित्ताच्या व्याधीला ही अतिशय पथ्यकर असून शरीरामध्ये रक्त, मांस व शुक्राची वृध्दी करणारी आहे. डोळ्यामधील उष्णता व कोरडेपणा कमी करणारी व दृष्टी चांगली ठेवणारी आहे. सतत तहान तहान होण, कोरडा खोकला, थकवा येणे, घसा बसणे, दौर्बल्य, रक्तक्षय यांच्यासाठी द्राक्षा ही एक उत्तम औषधी आहे. मद्याचे व्यसन सोडवण्याच्या औषधांसोबत द्राक्ष दिल्यास त्याचा फायदा होतो. उन्हाळ्यामध्ये ताजी द्राक्षे खाणे, द्राक्षाचे सरबत, कोळ, चटणी करुन वापरल्याने उष्णतेचा त्रास कमी होतो. उन्हाळी लागत नाही तसेच पोट साफ राहण्यास मदत होते. असे हे बहुमुल्य बहुगुणी फळ सर्वांनी नक्कीच सेवन करावे.

टीप - कफाचा त्रास असणाऱ्यांनी याचे सेवन शक्यतो टाळावे अथवा वैद्यकीय सल्ल्याने करावे.

**डॉ. शरावती कांबळे**
विभागप्रमुख, द्रव्यगुण विभाग,
भा. सं. द. ट्रस्ट संचालित आयुर्वेद महाविद्यालय, वाघोली, पुणे.

## व्याख्यान



दिनांक ८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनाच्या औचित्याने भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरच्या असिस्टंट डायरेक्टर डॉ. श्वेता गुजर व डॉ. प्रज्ञा कोद्रे यांचे महिलांच्या कॅन्सरबद्दल जागरुकता निर्माण व्हावी यासाठी भारतीय योग संस्थान, मगरपट्टा सिटी, हडपसर येथे महिलांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. महिलांचा या व्याख्यानासाठी उत्फूर्त प्रतिसाद लाभला.

## प.पू. श्री प्रभाकर सरदेशमुख महाराज - भंडारा



दिनांक ९ मार्च २०२४ रोजी महाशिवरात्री निमित्त प.पू. श्री प्रभाकर सरदेशमुख महाराजांचा वेद मंदिरात भंडारा आयोजित करण्यात आला. या प्रसंगी महाराजांच्या समाधीस्थानी व गुरुस्थानी पूजा व आरती करण्यात आली व नंतर संस्थेच्या सर्वांनी प्रसादाचा लाभ घेतला.

## मोफत कॅन्सर तपासणी शिबीर



८ मार्च २०२४ रोजी जागतीक महिला दिनानिमित्त भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर व पुणे शहर आयुक्तालया तर्फे पोलीस रिक्रिएशन हॉल, शिवाजीनगर, पुणे येथे मोफत कॅन्सर तपासणी व कॅन्सरबद्दलच्या जागरुतेसाठी शिबिर आयोजित करण्यात आले.

## आरोग्य तपासणी शिबीर, मुंबई




दिनांक ३ मार्च २०२४ रोजी भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर तर्फे दादर, मुंबई येथे Triple Negative Breast Cancer and Genetic BRCA Mutation Patients साठी आयुर्वेद तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. डॉ. तुषार जाधव (Surgical Oncologist) यांनी या शिबीरात रुग्णांशी संवाद साधला. इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरच्या डॉक्टरांनी या शिबीरात रुग्णांची तपासणी करुन त्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी रुग्णांसाठी आयुर्वेद व कॅन्सर या विषयांतर्गत प्रदर्शनही भरविण्यात आले.

## आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल चषक



भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोतदार आयुर्वेद महाविद्यालय, मुंबई येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावून रोख रक्कम रु. ५०००/- सह चषकांवर आपले नाव कोरले. श्री. उद्देश बरबडे व श्री. अरमान मुलाणी या विद्यार्थ्यांना अनुक्रमे Centre Player of Tournament व Best Lifter हे पारितोषिक प्राप्त झाले. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयामधील ९ संघानी सहभाग घेतला होता.

## नेत्ररोग-आरोग्य तपासणी शिबीर



दि. ६ मार्च २०२४ रोजी भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट संचालित आयुर्वेद महाविद्यालयाच्या शालाक्यतंत्र विभागातर्फे ज्ञानांकुर इंग्लिश मिडियम स्कूल, केसनंद येथील विद्यार्थ्यांची नेत्र, कान, नाक, घसा यांचे मोफत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. १०० हून अधिक विद्यार्थ्यांची या शिबीरात तपासणी करण्यात आली.

## जन्मदिन - अभिष्ट चिंतन

सौ. गीतांजली सरदेशमुख - १ मार्च

श्री. चिंतामणी शिंदे - १ मार्च

सौ. भीमाताई गायकवाड - १ मार्च

सौ. अंजना जाधव - २ मार्च

श्री. उमेश भोसले - ४ मार्च

डॉ. अपूर्वा पाठक - ६ मार्च

सौ. उषा अंगरख - ६ मार्च

डॉ. सुचिता शिरस्कर - ६ मार्च

श्री. श्रीकांत गुजराथी - १२ मार्च

सौ. शीतल क्षीरसागर - १२ मार्च

डॉ. सोनिया ताकवले - १७ मार्च

सौ. माधुरी कुंभार - २३ मार्च

डॉ. पल्लवी मोघे - २५ मार्च

डॉ. पूजा मोढ - २७ मार्च




### देणगीदारांना निवेदन

आयकर अधिनियम 35 (1) (ii) व 80 (G) अंतर्गत देणग्या चेक / डिमांड ड्राफ्टने 'भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट' या नावाने स्विकारल्या जातील.

प्रकाशक : भारतीय संस्कृति दर्शन ट्रस्ट
विश्वशांति धाम, केसनंद रोड, वाघोली, पुणे - ४१२२०७,
फोन : ०२०-६७३४६००० / ९५४५५०८८९०
ई-मेल : vsv.bsdt@gmail.com
वेबसाईट : www.bsdt.in

आयुर्वेद महाविद्यालय : ०२०-६७३४६१५२
आयुर्वेद हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर : ०२०-६७३४६१०४ / ६१३०
इंटिग्रेटेड कॅन्सर ट्रीटमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर : ०२०-६७३४६००० / ६१२१
अथर्व नेचर हेल्थकेअर प्रा.लि. : ०२०-२०२६१३६४, ८४४६००१३७६

फक्त खाजगी वितरणासाठी

विश्वशांति वृत्तांत समिती : डॉ. सदानंद प्र. सरदेशमुख, डॉ. वासंती गोडसे, डॉ. सुश्रुत सरदेशमुख, डॉ. पल्लवी मोघे, श्री. श्याम शितोळे